# मुंबई विद्यापीठ

क्रं. घ.म./ ०७ / २०१२

परिपत्रक :-

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय आणि अशासकीय, अनुदानीत व विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि सोशल वर्क, अभियात्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन आणि स्थापत्यशास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव यांना कळविण्यात येते की, अकृषि विद्यापीठे/अशासकीय अनुदानित महाविद्यालये यामधील अकृषि विद्यापीठातील अध्यापक/प्राचार्यांच्या निवड समितीमध्ये शासन प्रतिनिधीचा समावेश करण्याबाबत शासनाने शासन निर्णय क्रमांक एसयुके - २०११/(५५४/११)-विशि-१, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक ३० जानेवारी, २०१२, अन्वये आदेश निर्गमित केलेला आहे. सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली असून संदरच्या शासन परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.govt.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेत कमांक २०१२०१३१०४४०४५१४५००१ आहे.

मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २२ फेब्रुवारी, २०१२

प्राचार्य डॉ.एम.एस.कु-हाडे
प्रभारी कुलसचिव

प्रति,

विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकिय आणि शासकिय अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होमे सायन्स आणि सोशल वर्क, अभियात्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन आणि स्थापत्यशास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्राचार्य डॉ.एम.एस.कु-हाडे
प्रभारी कुलसचिव

प्रत माहीतीसाठी रवाना :-

१. मा. उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. मा. संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१.
३. सह संचालक, मुंबई विभाग, मुंबई - ४०० ००१.
४. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०० ०३२.
५. स्वीय सहायक, कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०० ०३२.
६. स्वीय सहायक, प्रभारी कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०० ०३२.
७. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).

**अकृषि विद्यापीठे/अशासकीय अनुदानित महाविद्यालये यामधील अकृषि विद्यापीठातील अध्यापक/ प्राचार्यांच्या निवड समितीमध्ये शासन प्रतिनिधीचा समावेश करण्याबाबत..........**

**महाराष्ट्र शासन,**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक एसयुके २०११/(५५४/११)-विशि-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जानेवारी, २०१२.

वाचा : १) विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना क्र.F-3.1/2009, दि.३० जून, २०१०.
२) शासन निर्णय क्र.संकीर्ण २०११/(२५/११)-विशि-१, दि.१५ फेब्रुवारी, २०११.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम ७६, ७७ व ७८ मध्ये अकृषि विद्यापीठातील शिक्षक / महाविद्यालयातील प्राचार्य पदाच्या निवड समितीमध्ये शासन प्रतिनिधी म्हणून शिक्षण संचालक किंवा सह संचालक दर्जापेक्षा कमी नसलेला त्यांचा प्रतिनिधी सदस्य असेल अशी तरतूद आहे.

२. तसेच दि.१५ जानेवारी, २००१ रोजी निर्गमित केलेल्या शासन परिपत्रकामध्ये शिक्षक निवडीच्या वेळी शिक्षण सह संचालकांनी स्वत: निवड समितीमध्ये हजर राहण्यासाठी सूचना दिल्या आहेत. काही अपरिहार्य कारणामुळे ते हजर राहू शकले नाहीत तर हजर राहणाऱ्या शासन प्रतिनिधींना योग्य त्या सूचना देण्यास कळविण्यात आले आहे.

३. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.३०-६-२०१० च्या अधिसूचनेतील परिच्छेद क्र.५.०० मध्ये अध्यापक पदासाठीच्या निवड समितीची रचना विहित केलेली आहे. सदर परिच्छेद क्र.५.०० मधील बाबी दि.१५-२-२०११ च्या शासन निर्णयान्वये जशाच्या तशा लागू करण्यात आलेल्या आहेत. सदर निवड समितीमध्ये शासन प्रतिनिधीचा समावेश नाही. त्यामुळे अध्यापक/प्राचार्यांच्या निवड समिती, कॅस निवड समितीमध्ये शासनाच्या प्रतिनिधीचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**

४. वर नमूद प्रस्तावनेतील बाबी विचारात घेऊन शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे :-

(१) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.३०-६-२०१० च्या अधिसूचनेन्वये अकृषि विद्यापीठे, महाविद्यालये / संस्था इ. मधील अध्यापक / प्राचार्य यांच्या निवडीसाठी विहित केलेल्या निवड समितीमध्ये तसेच करियर अॅडव्हान्समेंट स्कीम (CAS) साठी विहित केलेल्या समितीमध्ये शासन प्रतिनिधी म्हणून संबंधित विभागीय सह संचालकांचा समावेश करण्यात यावा.